# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


## // प्रेसनोट //

विषय :- "मीरा-भाईंदर में अवैध बैनरों पर मिरा भाईंदर महानगरपालिका निष्क्रिय ! उठे सवाल" वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या बातमीसंदर्भात.

संदर्भ :- कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.मिभाम-1125/सं.क्र.538/नवि-28, दि.10 मार्च, 2025.

मिरा-भाईंदर, जिल्हा ठाणे येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाचे तसेच न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन शनिवार दि.08 मार्च, 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता संपन्न झाले आहे.

दि.08/03/2025 रोजी प्रभाग कार्यालय क्र.04 कार्यक्षेत्रात बऱ्याच ठिकाणी अनधिकृत बोर्ड/बॅनर आढळून आल्याने न्यायालयाचे तसेच न्यायालयीन इमारतीचे उद्घाटनासाठी उपस्थित माननीय न्यायमूर्ती, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.

त्यामुळे श्री.सुधाकर लेंडवे, सहा.आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणात नोटीस देऊन खुलासा मागविला होता. त्यांनी खुलासा सादर केलेला असुन सदर खुलाश्यात खालीललप्रमाणे :-

"दि.07/03/2025 रोजी प्रभाग समिती क्र.04 कार्यक्षेत्रामध्ये बोर्ड/बॅनर लावल्याचे निदर्शनास आले असता सदरचे बोर्ड बॅनर काढण्याची कारवाई दि.08/03/2025 रोजीच्या रात्रौ पहाटे 2.00 वाजेपर्यंत करण्यात आलेली आहे. सदर कारवाई दरम्यान एकूण 98 बोर्ड/बॅनर निष्कासीत करण्यात आले होते. दि.08/03/2025 रोजी सकाळी प्रभाग कार्यालय क्र.04 च्या कार्यक्षेत्रामध्ये पुनःश्च बोर्ड बॅनर लावण्यात आल्याचे आढळून आले मात्र मा.न्यायालयाच्या नुतन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी मान्यवरांची VIP Movement मुळे होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता बोर्ड/बॅनर काढण्याची कारवाई दुपारी 02:00 वाजता सुरु करण्यात येवून सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत पूर्ण करण्यात आली. बॅनर पुनःश्च लावल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधीत व्यक्तीवर मीरा रोड पोलीस ठाणे व काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मा.न्यायमूर्तींनी अनधिकृत बोर्ड/बॅनर संदर्भात नाराजी व्यक्त केलेल्या घटनेबद्दल श्री.सुधाकर लेंडवे, सहा.आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांनी दिलगिरी व्यक्त करीत आहे तसेच यापुढे असे घडणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असे नमुद केले आहे."

उक्तप्रमाणे खुलाश्यामधील वस्तुस्थिती बघता सहा.आयुक्त यांनी दि.08/03/2025 रोजी पहाटे 2.00 वाजेपर्यंत बोर्ड/बॅनर काढणेची कार्यवाही केल्याची दिसून येत आहे. सदर कारवाई दरम्यान 98 बोर्ड/बॅनर त्यांनी निष्कासित केलेले आहेत. दि.08/03/2025 रोजी प्रभाग कार्यालय क्र.04 च्या कार्यक्षेत्रात सकाळी पुन:श्च बोर्ड/बॅनर आढळून आले. तथापि, मान्यवरांच्या VIP Movement मुळे



Scanned with OKEN Scanner

वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून बोर्ड/बॅनर काढण्याची कार्यवाही पुनःश्च दुपारी 2.00 वाजता सुरु करुन सायं.5.00 वाजेपर्यंत 182 बोर्ड/बॅनर काढून टाकलेले आहेत. तसेच संबंधित व्यक्तीवर मिरारोड पोलीस ठाणे व काशिमिरा पोलीस ठाणे येथे त्यांनी गुन्हा नोंदविलेला आहे. तरी सदर प्रकरणी त्यांनी दिलगीरी व्यक्त केलेली असल्याने तसेच यापुढे असे घडणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असे कबुल केलेले असल्यामुळे तसेच उपरोक्त प्रमाणे नमुद कार्यवाही केलेली असल्यामुळे त्यांना लेखी ताकीद महानगरपालिकेकडून देण्यात आलेली आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner